तक्रारीच्या कारणास्तव प्रशासकिय बदली करणे बाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-३/८१५ /२०२६
अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरीखाली नमूद प्रमाणे

वाचा:- १. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-४१४/ प्र.क्र-११२/आस्था- १४ दि. १५/०५/२०१४.
२. अपर आयुक्त, (आस्थापना), नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र क्र.विआशा/ आस्था ४/ ३५२२४१९/२०२६ दि.१७.०८.२०२६

ज्याअर्थी संदर्भ क्र.०१ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार पूर्वमान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करण्यांत आलेला होता. त्याअनुशंगाने संदर्भ क्र.०२ अन्वये तक्रारीच्या कारणास्तव प्रशासकिय बदलीच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत आलेली आहे.

त्याअर्थी जिल्हा परिषदे अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क या संवर्गातील खाली नमूद कर्मचा-यांच्या नावा समोरील रकाना क्रमांक ४ येथून रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी तक्रारीच्या कारणास्तव प्रशासकीय बदलीसाठी संदर्भ क्र.०२ अन्वये मान्यता मिळाल्याने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | पदनाम | सध्याचे कार्यरत ठिकाण | प्रशासकीय बदलीने द्यावयाचे ठिकाण | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री. के.आर. कु-हे, | वरिष्ठ सहाय्यक | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, पंचायत समिती कोपरगांव | गटशिक्षण कार्यालय, पंचायत समिती नेवासा | प्रशासकीय |

वरील कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकामी आदेशाच्या दिनांकापासुन कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुन एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ मधील प्रकरण-१ मुद्दा क्र. ७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन आदेशाच्या दिनांकानंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत अन्यथा पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास, अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल.

तसेच बदली ही संपुर्ण प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ६ (५) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. सदर बदली प्रशासकिय कारणास्तव झालेली असलेने संबधीतांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय आहे.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 20260819040150 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 18-08-2026 19:30:04
आनंद भंडारी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.के.आर.कु-हे, वरिष्ठ सहाय्यक, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, पंचायत समिती कोपरगांव

व्दारा - उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, पंचायत समिती कोपरगांव

प्रत:- उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, पंचायत समिती कोपरगांव

२/- उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधीताचे वेतन आदेशाच्या दिनांकानंतर अदा करु नये, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत - गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती कोपरगांव

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:- निवड नस्ती